# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## कंत्राटी पध्दतीने शहर समन्वयक (City co-ordinator ) नियुक्ती करण्याबाबत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्यां स्वच्छ सर्वेक्षणाकरीता मदत करण्याकरिता अकरा महिने कालावधीसाठी नगर विकास विभागाकडील क्रमांकःस्वमअ-२०२२/प्र.क्र.१३०/नवि-३४ दिनांक ७/११/२०२२ व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) जा.क्र./राअसर२.०/ १०३८/२२-२३ दिनांक १५/११/२०२२ नुसार कंत्राटी पध्दतीने समन्वयक (City co-ordinator ) या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक १२ /१२/२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | शहर समन्वयक (City co-ordinator ) | पदसंख्या - १ . |
| २. | शैक्षणिक अर्हता | मान्यता प्राप्त विद्यापिठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी.<br>अ. B.E. / B. Tech (कोणतीही शाखा)<br>ब. बी.आर्क.<br>क बी.प्लॅनिंग<br>ड. बी.एस.सी. (कोणतीही शाखा) |
| ३. | मानधन | र.रु. ४५,०००/- |
| ४. | अनुभव | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. |
| ५. | वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणुन अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल.) |

**उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी -**

१. उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज शैक्षणिक अर्हता, अनुभव, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज मा. आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांचे नावे फक्त मुख्य बारनिशी, मुख्यालय सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली येथे दिनांक १२ /१२ /२०२२ पर्यंत येथे सादर करण्याचा आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची मुलाखतीनंतर अंतिम निवड करण्यात येईल. याबाबतच्या तारखा अलहिदा कळविण्यात येतील. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमुद करावा.

३. नियुक्ती झालेल्या उमेदवारांची निवड झाल्यानंतर, कामाच्या आवश्यकतेप्रमाणे नंतर नियुक्ती आदेश दिले जातील.

४. सदर ठोक मानधनावरील नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापने वरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही.

५. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विवित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

६. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

क्र.मनपा /आस्थावि/०१/ 2031/२०२२-२०२३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक - 2/१२/२०२२.

02/12

(राहुल रोकडे)
उपायुक्त, (मुख्यालय)
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.